# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/09/2021 (शुक्रवार)

(सायंकाळ)

---

### खून

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 24/09/2021 चे 08.00 वा. पुर्वी फिर्यादी नामे– गणपत नारायण अतकरी, वय 56 वर्ष, रा. वार्ड क्र. 2, गोंडखैरी ता. कळमेश्वर हे मौजा गोंडखैरी येथील पोलिस पाटील असून ते दि. 24/09/2021 रोजी सकाळी 08.00 वा. च्या सुमारास त्यांच्या गौंडखैरी येथील शिवारातील शेताकडे जात असतांना त्यांना मौजा गोंडखैरी शिवारातील मायक्रो पार्क कंपनीच्या गोडाउनच्या पाठीमागे अंदाजे 300 मिटर अंतरावर रिंगरोडच्या डाव्या बाजुला लोकांची गर्दी दिसली म्हणुन त्यांनी तिथे जाउन पाहणी केली असता त्यांना अंदाजे 25 ते 30 वर्ष वयोगटातील अनोळखी इसम याचा अज्ञात आरोपीने डोक्यावर वार करून खून केल्याचे दिसल्याने त्यांनी पोलिस सटेशन कळमेश्वर येथेदिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. आसिफराजा शेख मो. क्र. 8408806690 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 20 किमी. अंतरावरील रामठी येथे दि. 23/09/2021 चे 15.00 वा. चे दरम्यान वंदना वामन सवई(मृतक), वय 37 वर्ष, रा. रामठी ता. नरखेड व तीचा पती वामन भागवत सवई व सोबत आनखी इसम व महीला हे शेतकाम संपवुन बैलबंडी वर बसुन नाल्यातील रस्त्याने घरी परत येत होते. त्यादरम्यान नाल्यातुन पुढे येत असता नाल्यातील पुराचा प्रवाह वाढल्याने बैलबंडीत असलेले सर्वजन पाण्यात पडले. त्यापैकी वंदना सवई हि पाण्यात वाहुन गेली व उर्वरीत इसम व महीला सुखरूप पुराबाहेर निघाले. तसेच मृतक हिचे प्रेत काही अंतरावरील जगन्नाथ पठाडे रा. रामठी यांचे शेताजवळील नाल्याच्या पाण्यातील झुडपात मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– युवराज संतोष ढोले, वय 30 वर्ष, रा. रामठी ता. नरखेड (पोलिस पाटील) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि. श्री. हरीशचंद्र गावडे मो.क्र. 8424043135 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर